

# ते दोघे ठाकरे



**(सौ. जयश्री खाडीलकर-पांडे कृत)**

**मुंबई, सोमवार - शिवसेना कार्याध्यक्ष उद्धव ठाकरे आणि मनसे अध्यक्ष राज ठाकरे या दोघांना अगदी जवळून जाणणारे मित्र, विश्लेषक, पत्रकार आणि लेखक राजू परूळेकर यांनी नवाकाळला विशेष मुलाखत दिली आणि मराठी माणसांच्या मनात स्थान मिळविलेल्या या दोन नेत्यांबद्दल अत्यंत व्यक्तीगत अशी माहिती मांडली.**

**प्र. उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेबाबत आपण काय म्हणाल?**

**राजू परूळेकर :** शिवसेना ही जैन धर्मीय आणि भैय्यांच्या आहारी गेली आहे ही उद्धवजींबाबत माझी एकच तक्रार आहे. उद्धव ठाकरे हे शांत, संयमी व सातत्यपूर्ण काम करणारे आहेत. मात्र त्यांच्या नेतृत्वात एक मोठी उणीव होती. त्यांच्याशी कोणालाच थेट संपर्क करता येत नसे. मिलींद नार्वेकर या सचिवावर भरंवसा टाकून उद्धवनी स्वतःवर संकट ओढवून घेतले. ही गोष्ट त्यांना कधी कळणार आहे? शिवसेनाप्रमुखांचा पुत्र म्हणून अनेकांनी त्यांना याबाबत आजवर सांभाळून घेतले. उध्दवनी आता मध्यस्थांना बाजूला सारून सर्वांशी थेट संपर्क साधायला हवा.

**प्र. उद्धवजींभोवती कोंडाळे आहे, असा आरोप होत होता. हाच आरोप आता राज ठाकरे यांच्याबाबतही होत आहे.**

**राजू परूळेकर :** राज ठाकरे यांचेही आता तसेच होऊ लागले. कोंडाळे तर नेत्याभोवती असणारच, पण तेवढी त्या लोकांची पात्रता असायला हवी ना? त्यांच्या निकटवर्तीयांनी त्यांना एसएमएस पाठविला तर तो अवकाशात कोठेतरी जातो. त्यांना फोन केला तर ते फोन उचलत नाहीत. एमटीएनएलच्या बंद डब्याप्रमाणे फोन फक्त वाजत राहतो. उद्धव ठाकरे यांच्या अनुभवातूनही राज ठाकरे यांनी धडा घेतला नाही हे त्यांचे दुर्दैव आहे व असे सल्लागार त्यांनी निवडता कामा नयेत.

राज ठाकरे हे राजकारणांत बऱ्याचदा चुकीच्या माणसांवर विश्वास टाकतात. या माणसांनी त्यांना धोका दिला की, त्यांच्यावर दयाळूपणे कटाक्ष टाकतात आणि स्वतःला दोष देत बसतात. पूर्वीच्या काळी शिवसेनेत गद्दारी केली की काय होत होते हे तुम्हाला माहीत आहे ना? राज साहेबांबरोबर असलेली काही माणसे समाजात काय प्रतिमा घेऊन वावरतात, याची माहिती राज ठाकरे यांनी घेणे आवश्यक आहे. ही माहिती घेतली तर राज ठाकरे यांना धक्का बसेल असा त्यांच्या काही सहकाऱ्यांचा भ्रष्टाचार त्यांना कळेल. नंतर स्वतःला दोष देण्यापेक्षा आधी माहिती घेतलेली केव्हाही नेत्याला फलदायक ठरते.

**प्र. : तुम्ही राज ठाकरे यांचे सल्लागार आहात ना ?**

**राजू परूळेकर :** मी त्यांचा सल्लागार आहे, हे पूर्ण असत्य आहे. राज ठाकरे मला काडीचीही किंमत देत नाहीत. ते स्वतःच स्वतःचे सल्लागार आहेत. एक मित्र म्हणून राज ठाकरे अतिशय उत्तम आहेत, अप्रतिम आहेत. पण त्यांच्या फायद्याचे काही सांगायला गेले तर मात्र ते ऐकत नाहीत. सांगणाऱ्याच्या फायद्याचे मात्र त्यांना काही सांगितले तर ते ऐकून लगेच मदत करतात. यामुळे स्वतःचा फायदा करणारी माणसे त्यांच्याभोवती जास्त दिसू लागली आहेत.

राज ठाकरे हे अतिशय बुद्धीमान आणि प्रतिभावान आहेत, पण त्यांच्या बुद्धीवर त्यांची प्रतिमा आणि प्रतिभा मात करते आणि ते कलावंतांचे आयुष्य जगू लागतात. रापलेल्या चेहऱ्याच्या आणि अंगाला घामाचा वास येणाऱ्या माणसाला त्याच्या पाठीवर हात फिरवणारा नेता आज हवा आहे. राज ठाकरेंकडे सामान्य माणूस ह्याच नजरेने बघतो. पण ते कलावंताच्या भूमिकेत जातात. कार्यकर्त्यांबरोबर तासनूतास बसणे, त्यांच्याशी चर्चा करणे, त्यांची माहिती घेणे ही प्रक्रिया यामुळेच बऱ्याचदा घडत नाही. राज ठाकरेंना मुख्यमंत्री म्हणून पाहण्याची माझी प्रचंड इच्छा आहे. पण त्यांच्या या दोषामुळे हे लगेच शक्य होईल की नाही, माहीत नाही. त्यांनी त्यांचे दोष काढले तर २०१४ साली ते निश्चित स्वबळावर मुख्यमंत्री होतील. पण त्यासाठी त्यांनी जाणीवपूर्वक आपले दोष दूर करायला हवेत.

**प्र. राज ठाकरे हे सतत सल्लामसलत करून नवनवीन आंदोलने आखत असतात. मग ते कार्यकर्त्यांशी संवाद साधत नाहीत, असे तुम्ही कसे म्हणता?** (पुढील मजकूर पान ५ )

**महत्त्वाचा खुलासा**

या मुलाखतीतील मतांची पूर्ण जबाबदारी राजू परूळेकर यांची आहे. त्यांनी मांडलेली मते ही 'नवाकाळ'ची मते नाहीत.

संपादक, नवाकाळ

